**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत आणि युरोपीय संघादरम्यान व्यापक वाणिज्यिक करारांवर चर्चा सुरु
- जागतिक उर्जा सप्ताह परिषदेचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन
- संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून, अर्थसंकल्प येत्या १ फेब्रुवारीला सादर होणार
- ऑपरेशन सिंदूर बाबत पाकिस्ताननं संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत मांडलेल्या भूमिकेचं भारतानं केलं खंडन

**आणि**

- देशाच्या विविध भागात थंडीचा जोर काही ठिकाणी हिमवृष्टीची, तर काही ठिकाणी वादळी पावसाची शक्यता

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष एँतिनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन देयर लेन यांच्याशी नवी दिल्ली इथं चर्चा करत आहेत. शिष्टमंडळ स्तरावरील या चर्चेनंतर अनेक करारांवर स्वाक्षऱ्या होणं अपेक्षित आहे. या चर्चेच्या पार्श्वभूमीवर  उर्सुला वॉन देयर लेन यांनी माध्यमांशी संवाद साधला, त्या म्हणाल्या....

**होल्ड बाईट उर्सला (३४ सेकंद)**

भारत आणि युरोपियन युनियन हे २००४ पासून धोरणात्मक भागीदार आहेत. १५ जुलै २०२० ला भारत - युरोपियन युनियन शिखर परिषद दूरस्थ पद्धतीने आयोजित करण्यात आली होती. तसंच गेल्यावर्षी युरोपियन युनियनच्या कमिशनर्सच्या भारत भेटीनंतर अनेक क्षेत्रात  भारत आणि युरोपियन यांच्यातल्या

कार्याचा विस्तार झाला. प्रजासत्ताक दिनी युरोपियन युनियनच्या नेत्यांच्या उपस्थितीमुळे भारत - ईयू धोरणात्मक भागीदारीत वाढ होण्यास मदत होणार आहे.

**<><><><><>**

भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातला मुक्त व्यापार करार भारत आणि ब्रिटनमधल्या कराराला पूरक असून यामुळे उत्पादन आणि सेवा क्षेत्राला चालना मिळेल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज ऊर्जा सप्ताहानिमित्त गोव्यात आयोजित परिषदेचं उद्घाटन  दूरस्थ पद्धतीने केल्यानंतर ते बोलत होते.

**होल्ड बाईट मोदी (२५ सेकंद)**

हा करार दोन अर्थव्यवस्थांमधल्या समन्वयाचं उत्कृष्ट उदाहरण आहे,असं प्रधानमंत्री म्हणाले. यामुळे भारतातल्या १४० कोटी आणि युरोपातल्या कोट्यवधी लोकांसाठी अनेक संधी उपलब्ध होणार आहेत. हा करार दोन्ही अर्थव्यवस्थांची लोकशाहीबद्दलची वचनबद्धता अधोरेखित करतो असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज गोव्यात सुरू होत असलेल्या **भारत ऊर्जा सप्ताह** २०२६ च्या चौथ्या परिषदेचं दूरस्थ पद्धतीने उद्घाटन केलं. भारतात ऊर्जेची मागणी सातत्याने वाढत असून ऊर्जा क्षेत्रासाठी भारतात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहेत असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले. ऊर्जा सप्ताह परिषदेमुळे जागतिक गुंतवणूकदारांना आकर्षित करण्याची संधी निर्माण होत आहे, हे व्यासपीठ संवादाचं व्यासपीठ म्हणून उदयाला येत आहे, असं त्यांनी सांगितलं. पेट्रोलियम पदार्थांची निर्यात करणाऱ्या जगातल्या पहिल्या पाच देशात भारताचा क्रमांक लागतो असंही प्रधानमंत्र्यांनी नमूद केलं. या उद्घाटन सोहळ्यात केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी, संयुक्त अरब अमिरातीचे उद्योग आणि प्रगत तंत्रज्ञान मंत्री डॉ. सुलतान अहमद अल जाबेर, कॅनडाचे ऊर्जा आणि नैसर्गिक संसाधन मंत्री टिम हॉजसन यांच्यासह आफ्रिका, मध्य पूर्व, मध्य आशिया आणि ग्लोबल साऊथमधील अनेक वरिष्ठ मंत्री उपस्थित होते.

**<><><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला उद्यापासून सुरुवात होत आहे. त्या पार्श्वभूमीवर महत्त्वाच्या राष्ट्रीय मुद्द्यांवर आणि कामकाजावर चर्चा करण्यासाठी, आज नवी दिल्लीत सर्वपक्षीय बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग बैठकीच्या अध्यक्षस्थानी आहेत. केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू , राज्य मंत्री अर्जुन राम मेघवाल आणि डॉ. एल मुरुगन बैठकीला उपस्थित आहेत. राज्यसभेचे सभागृह नेते जे पी नड्डा, काँग्रेसचे खासदार जयराम रमेश, द्रमुकचे तिरुची शिवा, तृणमूल काँग्रेसच्या सागरिका घोष, समाजवादी पार्टीचे रामगोपाल यादव इत्यादी नेते बैठकीत सहभागी झाले आहेत. २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प १ फेब्रुवारी रोजी सादर केला जाणार आहे. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा येत्या १३ फेब्रुवारीपर्यंत सुरू राहणार आहे. तर दुसऱ्या टप्प्याचं कामकाज ९ मार्च ते २ एप्रिल या कालावधीत होईल.

**<><><><><>**

डीआरडीओ अर्थात संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने प्रगत तंत्रज्ञान विकसित करून देशाची सुरक्षा व्यवस्था बळकट करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत डीआरडीओ शास्त्रज्ञांच्या सत्कार सोहळ्यात बोलत होते. डीआरडीओच्या ४५ प्रगत प्रयोगशाळा या संरक्षण क्षमतेचा कणा आहेत,, असं ते म्हणाले.

**होल्ड बाईट राजनाथ (२५ सेकंद)**

तंत्रज्ञान सतत विकसित होणाऱ्या या काळात उद्योग, शैक्षणिक क्षेत्र आणि सार्वजनिक उपक्रम यांच्यात समन्वय साधणाऱ्या परिसंस्थेची गरज आहे, जेणेकरून देशाची संरक्षण परिसंस्था बळकट होईल, असं राजनाथ सिंह म्हणाले.

<><><><><>

ऑपरेशन सिंदूर बाबत पाकिस्ताननं संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेत मांडलेली भूमिका पूर्णपणे खोटी असल्याचं सांगत भारतानं ती फेटाळून लावली आहे. जम्मू आणि काश्मीरसह इतर कोणत्याही देशांतर्गत मुद्दयावर कसलेही भाष्य करण्याचा अधिकार पाकिस्तानला नाही, हे भारतानं स्पष्ट केलं आहे.

आंतरराष्ट्रीय कायद्यासंदर्भात संयुक्त राष्ट्र परिषदनं आयोजित केलेल्या एका चर्चा सत्रात भारताचे यू एन मधले कायमस्वरूपी प्रतिनिधी पी. हरीश पाकिस्तानच्या प्रतिनिधीच्या दाव्याला प्रत्युत्तर देत होते . भारताचं आणि भारतीय नागरिकांचं नुकसान करणं हा पाकिस्तानचा एक कलमी कार्यक्रम असल्याची टीका त्यांनी केली. ऑपरेशन सिंदूर एक जबाबदार, नेमकी आणि संतुलित कारवाई होती. दहशतवाद्यांना आणि त्यांच्या पायभूत सुविधांना नष्ट करणं, हा या मोहिमेचा उद्देश होता. त्यामुळे या मोहिमेला पाकिस्ताननं दिलेल्या प्रतिसादानंतर नवीन सामान्य परिस्थिती निर्माण झाल्याचा पाकिस्तानचा दावा खोटा आहे, कारण दहशतवाद कधीच सामान्य समजला जाऊ शकत नाही, असंही हरीश यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

बँकाचा कामकाजाचा आठवडा पाच दिवसांचा करावा या प्रमुख मागणीसाठी आज सर्व राष्ट्रीयकृत आणि सार्वजनिक बँकांचे कर्मचारी एक दिवसाच्या संपावर आहेत. बँक कर्मचारी गेल्या अनेक वर्षापासून ही मागणी करत आहेत. मात्र, वारंवार मागणी करुनही त्याकडे दुर्लक्ष होत असल्यानं नाईलाजानं आपण संपावर जात आहोत, असं आंदोलक कर्मचारी संघटनांनी म्हटलं आहे. काही बँक कर्मचाऱ्यांनी आपल्या शाखांसमोर मागणीच्या समर्थनासाठी निदर्शनंही केली. या मागणीवर विचार झाला नाही तर बेमुदत संपावर जाण्याची तयारी असल्याचं आंदोलकांनी सांगितलं. गेले

तीन दिवस सुट्ट्यांमुळे बँकांचं कामकाज बंद होतं, त्यामुळे ग्राहकसेवांवर त्याचा काहीसा प्रभाव दिसून येत आहे.

<><><><><>

नेपाळच्या नागरिकांना आपल्या भारत दौऱ्यादरम्यान क्यू आर कोड द्वारे आर्थिक व्यवहार करायला भारतीय रिझर्व्ह बँकेकडून लवकरच परवानगी दिली जाणार आहे. या संदर्भात आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा आणि भारत भेटीवर आलेले नेपाळ राष्ट्र बँकेचे गव्हर्नर यांच्यात चर्चा झाली. या शिवाय मुद्रा नीति, विदेशी मुद्रा व्यवस्थापन, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित देखरेख या बाबतही या दोघांनी चर्चा केली.

<><><><><>

१९वर्षाखालील क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज सुपर सिक्स फेरीत भारत आणि झिम्बाब्वे सामना होत आहे. नाणेफेक जिंकून झिम्बाब्वेने प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी मिळाली तेव्हा भारताच्या ३ षटकात बिनबाद ३५ धावा झाल्या होत्या.

झिम्बाब्वेत सुरु असलेल्या या स्पर्धेत भारतीय संघानं चांगली कामगिरी करत आतापर्यंतचे सर्व सामने जिंकले आहेत.

<><><><><>

पश्चिमेकडच्या वाऱ्यांच्या प्रभावामुळे देशाच्या उत्तर भागात थंडीचा जोर वाढला असून काही राज्यात हिमवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे.

जम्मूकाश्मीरमधे हिमवृष्टीमुळे रस्ता, रेल्वे आणि हवाई वाहतुकीवर परिणाम झाला आहे. श्रीनगर विमानतळावरची ८ उड्डाणं रद्द झाली. हिमाचल प्रदेशात थंडीचा

कडाका वाढला आहे. हिमवृष्टी आणि हलका पाऊस होत आहे. काही ठिकाणी २२ सेंटीमीटर पर्यंत जाड बर्फाचा थर साचला आहे. राज्याच्या अनेक भागात रस्ते वाहतूक बंद झाली आहे. शाळा महाविद्यालयांना आज सुट्टी देण्यात आली आहे. वीजपुरवठा पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. पर्यटकांची गर्दी वाढत आहे.जम्मू काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंडमधे पुढचे दोन दिवस पाऊस आणि हिमवृष्टीचा ऑरेंज अलर्ट हवामानविभागाने दिला आहे. राजस्थान, उत्तरप्रदेश, मध्यमहाराष्ट्र, मराठवाडा, छत्तीसगढ आणि मध्यप्रदेशात वादळी पावसाचा इशारा आहे. दिल्ली, पंजाब, हरयाणा, चंडीगढ आणि बिहारमधे थंडीची लाट राहील.

महाराष्ट्रात आज रायगड जिल्ह्याच्या अनेक भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली. मुंबई आणि परिसरात हलक्या पावसाची शक्यता आहे.

**//<><><><><>//**